RNI No. MAHBIL/2009/31743

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-ब

वर्ष ८, अंक ६] गुरुवार ते बुधवार, मार्च २४-३०, २०२२/चैत्र ३-९, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २०.००

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ फेब्रुवारी २०२२

### अधिसूचना

**महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवास्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६०.**

क्रमांक स्मारक २०२०/प्र.क्र.९८/सां.का.३.— ज्याअर्थी, शासनाच्या अधिसूचनेनुसार क्र. महाराष्ट्र शासनाने या सोबत असलेल्या अनुसूचीत निर्दिष्ट प्राचीन व ऐतिहासिक स्मारक संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याचा इरादा असल्याची महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवास्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६०(सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२) या अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) मधील तरतुदीनुसार दोन महिन्याची नोटीस दिली होती ;

आणि ज्याअर्थी, असे स्मारक संरक्षित म्हणून घोषित करण्यासंबंधी शासनाकडे कोणत्याही हरकती आलेल्या नाहीत.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवास्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६०(सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२) या अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त प्राचीन व ऐतिहासिक स्मारक संरक्षित स्मारक असल्याचे जाहीर करत आहे.

**अनुसूची**

**स्थान : खर्डा** **तालुका : जामखेड** **जिल्हा : अहमदनगर**

**सर्व्हे/गट क्र. :- १२२४, १७३६/२, १७३६/३**

| | | |
|---|---|---|
| **स्मारकाचे नाव** | : | निंबाळकर गढी, निंबाळकर छत्री, ओंकारेश्वर मंदिर व बारव. |
| **मालकी** | : | रयत शिक्षण संस्था व इतर. |
| **तपशील** | : | पेशवाईत मराठे व निजाम यांच्यात झालेल्या खर्ड्याच्या ऐतिहासिक लढाईत सरदार निंबाळकर यांची महत्त्वाची भूमिका आहे. त्यांची निष्ठा व शौर्य यांची साक्ष देणारे त्यांचे निवासस्थान म्हणजे निंबाळकर गढी होय. सरदार निंबाळकर यांनी शेवटपर्यंत येथे वास्तव्य केले. गढी सोबत त्यांची समाधी असून त्यांचे आराध्य दैवत असलेले ओंकारेश्वर मंदिर व बारव या महत्त्वपूर्ण वास्तू आहेत. |
| **संरक्षित करावयाच्या स्मारकाचे क्षेत्रफळ.** | : | (१) निंबाळकर गढी :- लांबी २१० मी. x रुंदी १८० मी. = ३७८०० चौ.मी.<br>(२) निंबाळकर छत्री :- लांबी ३७ मी. x रुंदी २५ मी. = ९२५ चौ.मी.<br>(३) ओंकारेश्वर मंदिर व बारव :- लांबी १७५ मी. x रुंदी १५० मी. = २६२५० चौ. मी. |
| **संरक्षित करावयाच्या स्मारकाभोवतालचे क्षेत्र.** | : | उपनिर्दिष्ट स्मारकांच्या प्रत्येक बाजूकडून ५ मीटरपर्यंतचे क्षेत्र. |
| **संरक्षित करावयाच्या क्षेत्राच्या चतू:सीमा.** | : | (१) निंबाळकर गढी<br>पूर्व : रस्ता ;<br>पश्चिम : राघोबा गोलेकर व बाबुरामा गोलेकर यांची जागा ;<br>उत्तर : रस्ता ;<br>दक्षिण : केशव पाटील व बलभिम गोलेकर, भैरु येवले यांची जागा.<br>(२) निंबाळकर छत्री<br>पूर्व : अप्पा आंदळकर यांची जागा ;<br>पश्चिम : रस्ता ;<br>उत्तर : बारव ;<br>दक्षिण : संजय कुंभार यांची जागा.<br>(३) ओंकारेश्वर मंदिर व बारव<br>पूर्व : पप्पू कोरे यांची जागा ;<br>पश्चिम : नाळे शेत जमीन ;<br>उत्तर : गावठाण ;<br>दक्षिण : नाळे वस्ती. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विलास रा. थोरात,**
शासनाचे उप सचिव.

## TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 15th February, 2022

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ANCIENT MONUMENTS AND ARCHAEOLOGICAL SITES AND REMAINS ACT, 1960.

No. SPM-2020/C.R.98/C.A.3.—Whereas, by Government Notification, the Government of Maharashtra had given two months notice of its intention to declare the ancient and historical monument specified in the Schedule appended to here to be a protected monument, AS REQUIRED BY SUB-SECTION (1) OF SECTION 4 OF THE MAHARASHTRA ANCIENT MONUMENT AND ARCHAEOLOGICAL SITES AND REMAINS ACT, 1960 (MAH. XII OF 1961); the Government has not received any objection to the making of such declaration.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(3)* of section 4 of the Maharashtra Ancient Monuments and Archaeological Sites and Remains Act, 1960 (Mah. XII of 1961), the Government of Maharashtra hereby declare the said ancient and historical monument to be a protected monument.

*Schedule*

Locality: Kharda    Taluka: Jamkhed    District: Ahmadnagar

Survey/Gat No. 1224, 1736/2, 1736/3

| | | |
|---|---|---|
| *Name of the Monument to be protected.* | : | Nimbalkar Gadhi, Nimbalkar Chhatri, Omkareshwar Temple and Barav. |
| *Ownership* | : | Rayat Shikshan Sanstha and others. |
| *Particulars* | : | Sardar Nimbalkar played a vital role in the Battle of Kharda which was fought between Maratha and Nizam during Peshwa period. Nimbalkar wada at Kharda which tells us the stories of loyalties and braveness of Sardar Nimbalkar. Sardar Nimbalkar lived here till his last breath. In front of this Wada important monument like his samadhi (Grave) is, the temple of their clan deity Omkareshwar and Barav (step well) are located. |
| *Area of the Monument to be Protected.* | : | (1) Nimbalkar Gadhi: length 210m. x width 180m = 37800 Sq.m.<br>(2) Nimbalkar Chhatri : length 37m. x width 25m = 925 Sq.m.<br>(3) Omkareshwar Temple and Barav (step well): length 175m.x width 150m = 26250 Sq.m. |
| *Total Area around the Monument to be protected.* | : | 5 meters on all sides of the above mentioned area. |

*Boundaries* : (1) Nimbalkar Gadhi

East: Road ;

West: Raghoba Gholekar and Baburama Gholekar's land ;

North: Road ;

South : Keshav Patil, Balbhim Gholekar and Bairu Yeole's land.

(2) Nimbalkar Chhatri

East: Appa Aandalkar's land ;

West: Road ;

North : Barav (step well) ;

South : Sanjay Kumbhar's land.

(3) Omkareshwar Temple and Barav (Step Well) ;

East: Pappu Kore's land ;

West: Nale's Agricultural land ;

North: Gaonthan ;

South : Nale's settlement (vasti).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS R. THORAT,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.